# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०३/०२/२०२३

### जिल्हा : जळगाव

### हवामान अंदाज :

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०३/०२/२०२३ ते ०७/०२/२०२३) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | **4** | **5** | **6** | **7** | **8** |
| पाऊस (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कमाल तापमान (अं.से.) | 30 | 30.8 | 32.1 | 32.7 | 33 |
| किमान तापमान (अं.से.) | 12 | 11.8 | 13.8 | 13.8 | 14.3 |
| ढग स्थिती (आकाश) | 1 | 0 | 0 | 0 | 1 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 72 | 70 | 68 | 67 | 67 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 48 | 47 | 46 | 45 | 45 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 7.4 | 8.7 | 8.3 | 7.2 | 7.3 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 65 | 64 | 66 | 105 | 288 |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२३ ते ०७ फेब्रुवारी, २०२३ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ०१ ते ०७ फेब्रुवारी, २०२३ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • शेतकरी बांधवांनी पक्व पिकांची काढणी सकाळी करावी. काढणी केलेल्या पिकाची व धान्य सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल अॅपचा वापर करावा.<br>• तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व विजेचा पूर्वानुमाना करीता दामिनी मोबाईल अॅपचा वापर करावा. |
| हरभरा | फुलोरा ते घाटे भरण्याची अवस्था | हरभरा पिकास तुषार सिंचन पद्धतीने योग्य प्रमाणात पाणी द्यावे. त्यामुळे उत्पादनात मोठी वाढ होते. सध्याच्या हवामानामुळे हरभरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येताच ५ % निबोंळी अर्काची फवारणी करावी. हरभरा पिकावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी इंग्रजी 'T' आकाराचे प्रति हेक्टरी ५० पक्षीथांबे उभारल्यास किड आटोक्यात ठेवण्यास मदत होते. किडीचे प्रमाण जास्त |

| | | |
|---|---|---|
| | | असल्यास त्याच्या रासायनिक नियंत्रणासाठी अझाडीरेक्टीन १५०० पी.पी.एम. ५० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| गहू | कांडी धरण्याची ते लोंबी धरण्याची अवस्था | गहू पिकाच्या ज्या महत्त्वाच्या अवस्था आहेत , त्या वेळी पिकास पाणी देणे फायद्याचे आहे. दुसरे पाणी ४२ ते ४५ दिवसांनी (कांडी धरण्याची वेळ) आणि तिसरे पाणी ६० ते ६५ दिवसांनी (पीक ओंबीवर येण्याची वेळ) द्यावे तसेच स्थानिक परिस्थिती व जमिनीच्या खोलीनुसार पाण्याच्या दोन पाळ्यामध्ये अवशक्तेनुसार अंतर ठेवावे. गहू पिकावरील मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच त्याच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० % प्रवाही १० मिली किंवा इमीडयाक्लोप्रीड १७.८ एस.एल. ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| करडई | फुलोरा ते दाणे भरण्याची अवस्था | करडई पिकावरील मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच व्यवस्थापनासाठी मेटारेझीम अनिसोप्ली ५० ग्राम किंवा डायमेथोएट ३० % प्रवाही १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अल्टरनेरीया बुरशीमुळे होणार्याद करडईच्या पानावरील ठिपके रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेनडॅझिम १२% + मॅन्कोझेब ६३% या संयुक्त बुरशीनाशकाची २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यातून रोगाची लक्षणे दिसताच फवारणी करावी. |
| तुर | शेंगा भरण्याची ते पक्वता अवस्था | तुरीमधील घाटे अळी /पिसारी पतंग व शेंग माशी यासाठी एकात्मिक किड व्यवस्थापन पध्दतीने नियंत्रण करावे यामध्ये एच .एन.पी.व्ही **(HNPV)** ५०० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टर य़ा जैविक किडनियंत्रणाचा वापर करावा. गरजेनुसार १८ .५ **%** प्रवाही क्लोरअॅट्रीनिलीप्रोल १५० मिली अथवा इमामेक्टीन बेझोएट २०० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| उन्हाळी भुईमुग | पेरणी अवस्था | उन्हाळी भुईमुगाची पेरणी १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी. तापमान १५-१८ डिग्री सेल्सिअस पर्यंत वाढत नाही तोवर पेरणी करू नये. उन्हाळी भुईमुग लागवडीसाठी हेक्टरी ५ टन शेणखत/ सेंदिय खत जमिनीत मिसळावे . भुईमुग पिकाचे सुधारीत वाण जसे फुले उन्नती, टी.ए.जी.-२४, टी.जी.-२६, टी.पी.जे.-४१, जे.एल.-५०१, एस.बी.-११, फुले भारती वाणांची निवड करावी. |
| वांगी | पीक वाढीची अवस्था | सध्याच्या हवामानामुळे वांग्यामध्ये शेंडा आणि फळे पोखरण्या-या अळीच्या नियंत्रणासाठी ४ **%** निंबोळी अर्क किंवा सायपरमेथ्रीन २५ **%,** ५ मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारावे. दर आठवड्याला किडलेले शेंडे आणि फळे गोळा करुन नष्ट करावीत. |
| कोबीवर्गीय पिके | पिक वाढीची अवस्था | कोबी पिकावरील मावा व फुलकोबीतील गड्डा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी म्यलेथिओन ५० ई. सी. २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे किंवा ४ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| केळी | | केळी पिकावरील फुलकिडीच्या नियंत्रणासाठी केळीच्या घडाला ६ टक्के सच्छीद्रतेच्या पांढरे प्लास्टिक बॅगचे आवरण करावे. मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट २० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. केळी बागेत काकडी, भोपळा, कलिंगड, खरबूज तसेच मिरची, वांगी यासारखी पिके घेणे कटाक्षाने टाळावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | सर्व जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे. पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वछ पाणी द्यावे. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : ०३.०२.२०२३

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**